**नि.दि.दावा क्र. १२/२०२४**
हणमंत वि. मिना

## निशाणी क्र.३३ खालील आदेश

प्रतिवादी क्रं. १ व २ तर्फे प्रस्तुतचा अर्ज त्यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी व कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी यांचे कथन असे की, वादीने प्रस्तुतचा दावा ठरावासाठी व ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचे प्रस्तुत अर्जात कथन असे की, सदर दावा हा स्थावर मिळकतीचा असल्यामुळे शेतजमीनीची कागदपत्रे व माहिती गोळा करुन विधिज्ञांना विस्तृत माहिती देण्याकरिता उशीर झालेने कैफियत दाखल करणेकामी १४ महिने १४ दिवसांचा विलंब झाले आहे. दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असल्याने प्रतिवादी यांना प्रस्तुत दाव्यात कैफियत दाखल करणे आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळावा व कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे.

**०३.** वादीने प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.३३ वर म्हणणे दाखल केले आहे. वादीचे म्हणणे असे की, प्रतिवादी यांचा अर्ज व त्यामधील मजकुर खोटा आहे. झालेला उशीर हा एक वर्षापेक्षा जास्त आहे. केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्याकरिता प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, वरील कारणांमुळे प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले.

**०५.** प्रतिवादी व वादी यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**०६.** एकंदरीत अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज पाहिला असता असे दिसते की, प्रतिवादी हे स्थावर मिळकतीच्या अनुषंगाने दाव्यामध्ये कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून कैफियत दाखल करण्याची परवानगी मागत आहे. शेतजमीनीची कागदपत्रे व माहिती गोळा करुन विधिज्ञांना विस्तृत माहिती देण्याकामी उशीर झालेने कैफियत दाखल करता आले नाही. वादीने त्यांच्या म्हणण्यामध्ये प्रतिवादीने केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी मुद्दामहून दाव्यास कैफियत दाखल केलेली नाही त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र असल्याचे कथन केले आहे.

**०७.** वादीतर्फे वकीलांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास प्रतिवादीस बराच कालावधी लागला आहे. प्रतिवादीने याबाबत कोणतेही ठोस असे कारण दिलेले नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज मंजूर करता येणार नाही. वादीच्या कथनाप्रमाणे निश्चितच प्रतिवादीना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास १४ महिने १४ दिवसांचा कालावधी लागला आहे. साहजिकच वाद मिळकती संदर्भातील सर्व घाडामोडी प्रतिवादीना माहितीत असणे सकृतदर्शनी स्वाभाविक वाटते. परंतु, प्रतिवादीने आजारी असल्यामुळे व लग्न कार्य असलेने त्याला वेळेत कैफियत दाखल करता आली नसल्याचे कथन केले आहे. परंतु, सदरची कथने ही देखील साहजिकच याठिकाणी सबळ व ठोस आहे असे म्हणता येणार नाही. परंतु, प्रतिवादीने तसे सबळ कारण दिलेले नाही या कारणाने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित ठरत नाही. प्रतिवादीने त्याच्या कथनापुष्टयर्थ नि.२४ वर प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे गुणदोषांवर निराकरण होण्यासाठी प्रतिवादीला त्याची बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्याचवेळी प्रतिवादीने केलेला विलंब व त्यामुळे दाव्याचे थांबलेले कामकाज या सर्व गोष्टींचा विचार करता त्याकरीता प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, नैसर्गिक न्यायतत्वाचे अवलोकन करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. अर्ज **(नि.३३)** खर्च रक्कम रु.१,०००/- वादीला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला १४ महिने १४ दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो.

३. आदेश क्र.१ ची पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

SANTOSH VISHNU MUNDE

Digitally signed by SANTOSH VISHNU MUNDE
Date: 2026.02.13 17:18:52 +0530

दिनांकः- १३.०२.२०२६.

**(एस.व्ही. मुंडे)**

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मोहोळ.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file of Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Clerk | : | K. K. Surwase |
| Court | : | Jt.C.J.J.D., Court No. 2, Mohol |
| Date | : | 13/02/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 13/02/2026 |
| Judgment Uploaded on | : | 13/02/2026 |